0 8 MAR 2022
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शाश्वत प्रगतीत महिला उद्योजकांचे योगदान महत्त्वाचे

## कुलगुरू डॉ. शिर्के; शिवाजी विद्यापीठात महिला मेळावा, उद्योग प्रदर्शन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

देशाच्या शाश्वत प्रगतीमध्ये महिला उद्योजकांचे योगदान महत्त्वाचे असणार आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ (फेस्कॉम) - फेस्कॉम मनोयुवा कौन्सिल फेस्कॉम प्रादेशिक विभाग, सांगली आणि कोल्हापूर व सावित्रीबाई फुले ज्येष्ठ महिला नागरिक सेवा संघ यांच्या संयुक्त विद्यमाने कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांतील महिलांसाठी जागतिक महिला दिनानिमित्त महिला मेळावा व महिला उद्योजकांसाठी उद्योग प्रदर्शनाचे उद्घाटन डॉ. शिर्के यांच्या हस्ते झाले.

डॉ. शिर्के म्हणाले, कौटुंबिक संस्काराचे केंद्र स्त्रीकडे असल्यामुळे भावी समाज घडविण्याची शक्ती महिलांमध्ये असते. महात्मा गांधी यांना अभिप्रेत देशाच्या शाश्वत विकासामध्ये मोलाचे योगदान देण्याची क्षमता महिलांकडे आहे. त्या दृष्टीने त्यांनी संघटनात्मक स्तरावर प्रयत्न करीत राहायला हवे.

### उद्योग प्रदर्शनात २९ स्टॉल

उद्योग प्रदर्शनात २९ स्टॉल मांडण्यात आले होते. महिलांनी तयार केलेल्या विविध वस्तू, उत्पादनांची माहिती व विक्री असा दुहेरी उपक्रम होता. विद्यापीठातील सेवकांसह उपस्थितांनी स्टॉलना भेट देऊन विविध वस्तूंची खरेदी केली.

याप्रसंगी 'महिला सबलीकरण' या विषयावर निवृत्त जिल्हा व सत्र न्यायाधीश ऊर्मिला जोशी यांचे व्याख्यान झाले. यावेळी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सत्कार करण्यात आला.

आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे प्रभारी संचालक प्रा. डॉ. ए. एम. गुरव यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक डॉ. सुशीला ओडियार यांनी केले. सूत्रसंचालन सुस्मिता खुटाळे यांनी केले. सविता मोरे यांनी आभार मानले.

0 8 MAR 2022

पुढारी

जनसंपर्क कक्ष

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या ३० टक्के विद्यार्थिनींचा 'स्टार्टअप'मध्ये झेंडा

## एकीला जैविक खताचे पेटंट, तर दुसरीच्या 'डी-कॅफे' नवसंकल्पनेला बळ



सुप्रिया कुसाळे



मुग्धा सावंत

**कोल्हापूर : प्रवीण मस्के**

शिवाजी विद्यापीठ नवोपक्रम, नवसंशोधन केंद्रामार्फत नवसंकल्पनांना पाठबळ दिले जात आहे. यातून नवनिर्मितीच्या कल्पना मोठ्या प्रमाणात पुढे येत आहेत. स्टार्टअपमध्ये विद्यार्थिनींचे प्रमाण ३० टक्के आहे. फूड सायन्सची विद्यार्थिनी सुप्रिया कुसाळेला जैविक खताचे पेटंट, तर पीएच.डी. संशोधक मुग्धा सावंतच्या 'डी-कॅफे' नवसंकल्पनेला बळ मिळाले आहे.

जागतिक महिला दिन विशेष

सध्या सर्वच स्तरांवर नवोपक्रम, नवनिर्मिती व स्टार्टअपची चर्चा सुरू आहे. शिवाजी विद्यापीठात २ लाख ५० हजार विद्यार्थी शिक्षण घेतात. त्यामध्ये ५० टक्के विद्यार्थिनी आहेत. २०१६ साली महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ **पान २ वर**


# शिवाजी विद्यापीठाच्या ३० टक्के विद्यार्थिनींचा 'स्टार्टअप'मध्ये झेंडा


(पान १ वरून) कायद्याची अंमलबजावणी झाली. कायद्यांतर्गत विद्यापीठात नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्र स्थापन झाले आहे. केंद्रांतर्गत सेक्शन ८ कंपनी सुरू झाली आहे. कंपनीमार्फत विद्यापीठ परिक्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या नव संकल्पनांना मूर्त स्वरूप देण्याचे काम सुरू आहे. कंपनीने विविध उपक्रमांची सुरुवात केली असून, त्यामध्ये मुलींचा टक्का दिवसेंदिवस वाढत आहे. राज्य शासनाच्या महाराष्ट्र इनोव्हेशन सोसायटीमार्फत सर्व विद्यापीठांना भरघोस अनुदान दिले जात आहे.

विद्यापीठाने नोव्हेंबरपासून आजपर्यंत नवसंकल्पना मांडणीसाठी विविध स्पर्धा घेतल्या आहेत. यात २०१ विद्यार्थ्यांच्या नावीन्यपूर्ण संकल्पनांचा समावेश होता. या संकल्पनांमधून ७ नवसंकल्पना स्टार्टअप म्हणून पुढे घेऊन जाण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला आहे. यात ३० टक्के विद्यार्थिनींचे प्रमाण आहे. विद्यापीठामार्फत 'स्टार्टअप सूत्रा' नावाची व्याख्यानमाला सुरू केली आहे. यात ५० टक्के मुली व महिला सहभागी झाल्याचे दिसून आले आहे. केंद्रामार्फत दोन विद्यार्थिनींनी सादर केलेल्या नवसंकल्पनांना विद्यापीठाने स्टार्टअप म्हणून मान्यता दिली आहे.

भारत सरकारच्या स्टार्टअप इंडिया व राज्य सरकारच्या उपक्रमाच्या माध्यमातून दक्षिण महाराष्ट्रातील नावीन्यपूर्ण संकल्पनांना चालना व शाश्वत विकासासाठी प्रयत्न केले जात आहेत. महिला सक्षमीकरणाच्या अनुषंगाने जास्तीत जास्त विद्यार्थिनी व महिलांचा सहभाग वाढविण्याचा मानस आहे.

**- डॉ. एम. एस. देशमुख**, प्रभारी संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्र, शिवाजी विद्यापीठ

### 'डी-कॅफे' कॉफीस पर्याय; पेटंटसाठी अर्ज

फूड सायन्स अँड टेक्नॉलॉजी विभागातील मुग्धा सावंत या विद्यार्थिनीने स्टार्टअपअंतर्गत 'डी-कॅफे' हे पेय कॉफीस पर्याय म्हणून तयार केले आहे. यात कॉफीचा अंश नसून, यात कॉफीचा स्वाद आहे. कॉफीच्या बिया न वापरता त्याच्यामध्ये स्वाद आणि चव विकसित केली आहे. यातून जास्त प्रमाणात प्रोटिन व कॅल्शियम मिळतात. याचा लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांना फायदा होऊ शकतो. उच्च रक्तदाब, गरोदर स्त्रिया, थायरॉईड या आजारांतील लोकांना जास्त कॅफीन असलेल्या पदार्थांचे सेवन घातक ठरू शकते. पेटंटसाठी विद्यार्थिनीने अर्ज केला आहे.

### शेतकऱ्यांच्या खर्चात कपात होणार, उत्पादन वाढणार

सूक्ष्मजीवशास्त्र विभागातील सुप्रिया कुसाळे या विद्यार्थिनीने सेंद्रिय खतावर नावीन्यपूर्ण संशोधन करून जैविक खत तयार केले आहे. त्यामध्ये मातीतील नत्र, फॉस्फरस व पोटॅशियम घेण्याची सुविधा केली आहे. या जैविक खतामध्ये 'फायटेज'चा उपयोग केल्याने जमिनीतील नत्र, स्फुरद व पलाश यांचे प्रमाण वाढल्याने पिकाचे उत्पादन वाढते. ऊस, फळभाजा, पालेभाज्या यांच्या वाढीसाठी हे जैविक खत उपयोगी ठरत आहे. जमिनीचा पोत सुधारण्यास मदत होते. शेतकऱ्यांच्या खर्चात कपात होऊन उत्पादनात वाढ होते. यासाठीचे पेटंट भारत सरकारकडून मिळाले आहे.

तरुण भारत

# 'विद्यार्थ्यांनी खगोलशास्त्रीय घटनांचा अभ्यास करावा'

**कोल्हापूर :** ताऱ्यांची उत्पत्ती, स्थिती आणि अंत यांचा अभ्यास करणे खूप रंजक बाब आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी खगोलशास्त्रीय घटनांचा अभ्यास करावा, असे प्रतिपादन भौतिकशास्त्र विभागाचे डॉ. एम. व्ही. टाकळे यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील एसएआयएफ–डीएसटी केंद्राच्या वतीने आयोजित राष्ट्रीय विज्ञान सप्ताह समारंभात ते बोलत होते. हा कार्यक्रम भौतिकशास्त्र विभागाच्या हॉलमध्ये आयोजित केला होता.

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठातील वसतिगृहात प्रवेशाला प्रारंभ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील दहा वसतगिृह सुरू झाली आहेत. त्यासंदर्भातील पत्र वसतिगृह अधिक्षकांनी विद्यापीठातील ३८ अधिविभागांना पाठवले आहे. परंतु परीक्षा सुरू असल्याने प्रवेशाच्या पहिल्या दिवशी एकाही विद्यार्थ्याने प्रवेश घेतला नाही. परंतु येत्या दोन दिवसात विद्यार्थी वसतिगृहात प्रत्यक्ष प्रवेश घेतील, अशी माहिती वसतिगृह अधीक्षक डॉ. एस. पी. हंगिरगेकर यांनी दिली.

डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवनमध्ये 'कमवा व शिका योजने" अंतर्गत गरीब, होतकरू आणि हुशार विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार आहे. भवनमध्ये प्रवेश घेण्यासाठी ३०० विद्यार्थ्यांचे अर्ज आले आहेत. यंदा फक्त प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार आहे. त्यामुळे जवळपास २०० विद्यार्थ्यांना भवनमध्ये प्रवेश दिला जाणार आहे. येत्या काही दिवसात मुलाखती घेतल्या जाणार आहेत. परंतु वसतिगृहासाठी विद्यार्थ्यांनी त्वरित प्रवेश घ्यावा, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने केले जाणार आहे.

Times of India

# Hostel facilities for SUK students to reopen soon

TIMES NEWS NETWORK

File Photo



There are as many as 91 hostels in 276 colleges affiliated to the SU

**Kolhapur:** The hostel facilities for students on the premises of Shivaji University, Kolhapur, (SUK) — which were being used as Covid isolation facilities — will now be reopened for the varsity students as the administration has given its permission for the same.

A total of 91 hostel facilities are there in the 276 colleges affiliated with the SU in Kolhapur, Sangli and Satara districts.

Dr S.P. Hangergikar, the chief rector of SU's hostel said, "The summer session of the colleges has begun from March 2, and accordingly the preparations for reopening hostel facilities was done by SU. All the departments were informed about the hostel re-opening on Monday. The admission process for the hostel facilities has been started."

There are 276 colleges affiliated with Shivaji University, where 2.5 lakh students are studying.

There are 41 departments in the university. On the university premises, there are 10 hostel facilities, of which, three buildings are boys hostel, two girls hostel, two for work and earn scheme, two for technology department and one building for PhD researchers

As these hostel facilities were closed, the rural students were facing difficulties, said Hangergikar.